# युवाविवेक

## ई-दिवाळी अंक
## २०२४



# अंकातून..

वाचनाने माणूस घडत जातो; समृद्ध होत जातो, हे आपल्याला माहीत असणारं असं तत्त्वज्ञान आहे. पण हे तत्त्वज्ञान अधिक गहीरं होत जातं, ते त्यांच्यातल्या मानसिक गोष्टी आपल्या लक्षात येतात तेव्हा.

आपण आपल्याला ओळखायला लागतो, हा सगळ्यात महत्त्वाचा असा वाचनाचा उपयोग आहे. जगण्यातला कार्यकारणभाव आणि जगण्यातलं तारतम्य या बाबीही वाचनाने अधिक प्रगल्भ होतात आणि माणूस म्हणून आपण अधिक उन्नत होत जातो. उदात्त होत जातो. आपल्यातले हे बदल आपल्याला सूक्ष्म पातळीवर जाणवणे आणि ते जाणवत असताना आपण वेगळा विचार करायला लागणे हेदेखील वाचनामुळे घडत जातं.

वाचनात जसं in between the lines वाचावी लागतात, तशी माणसाच्या वागण्यातली, घटना-प्रसंगांच्या मधली in between the lines आपल्याला कळायला, समजायला आणि उमजायला मदत होते, आणि कोणत्याही घटना-प्रसंगाकडे, माणसाच्या वागण्याकडे संयमितपणे

तसेच सहानुभावाने बघायला लावण्याची प्रेरणा वाचनामुळे आपल्याला निर्माण होते.

वाचनामुळे माणूस घडतो. समृद्ध होतो तो या अर्थाने. म्हणूनच युवांचं वाचन आणि एकूणच वाचनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन यासाठी यात 'युवक काय वाचतात?' असा एक विभाग आहे, तर दुसरा विभाग युवकांचं भावविश्व समृद्ध करणाऱ्या वेबसिरीजचा आहे. कोणत्याही प्रयोगशील कला या जनमानसाच्या मानसिकतेकडे लक्ष पुरवत असतात आणि माणसांच्या वृत्ती प्रवृत्तींची चिकित्सा रंजकपणे करून ते सर्वांसमोर मांडत असतात आणि प्रेक्षकांच्या वृत्ती प्रवृत्तींचं, भावनांचं कॅथारर्सिस करत असतात. त्यादृष्टीने हा विभाग वेबसिरीजवर ठेवला असून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी यात लेखन केलेले आहे.

या दिवाळीत तरूणांना समजून घेण्यासाठी या अंकाचं वाचन केलं पाहिजे.

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!!

# अंतरंग

**प्रबंध संपादक**
दिलीप करंबेळकर

**कार्यकारी संपादक**
डॉ. अर्चना कुडतरकर

**संपादन समन्वय**
मानसी झोरे, देवव्रत वाघ

**मुखपृष्ठ**
गिरीश चिवटे

**कार्यालयीन साहाय्य**
चेतन मॅडम

**वेबसाईट**
www.yuvavivek.com

**युवाविवेक इ-मेल आयडी**
yuvavivek2018@gmail.com

१४५३-१४५४, सदाशिव पेठ, म.ए.सो भावे पूर्व प्राथमिक शाळा, रेणुका स्वरूप शाळेशेजारी, पुणे ३०.
संपर्क : ७०४५७८१६८५

|| दिवाळी अंक २०२४ ||

युवाविवेक

# अनुक्रमणिका

## युवक काय वाचतात?


माझी वाचनाची सुरुवात
स्वागत दरक - ८

माझं वाचन, माझं आकलनं
प्रा. डॉ. सागर कुलकर्णी - १२

माझी पुस्तकांसोबतची जडणघडण
सौरभ नाईक - २३

मी काय वाचते? मी का वाचते?
डॉ. तन्वी बांबोळकर - २८

वाचता वाचता
पार्थ जोशी - ३३

वाचाल तर वाचाल
मृण्मयी चितळे - ३९


।। दिवाळी अंक २०२४ ।।

युवाविवेक

# अनुक्रमणिका

## वेबसिरीज आणि मी

I'mmature
शिवम थोपटे - ४४

Made In Heaven
माही गाडगीळ - ४७

Mirzapur
सिद्धार्थ काणे - ५२

Taaza Khabar
अश्विनी गुंड - ५५

Stranger Things
यश पाटील - ६०

Never I Have Ever
अनुजा ब्रह्मे - ६५

# युवक काय वाचतात ?




।। दिवाळी अंक २०२४ ।।

युवाविवेक

# माझी वाचनाची सुरुवात



स्वागत दरक
एम.पी.एस.सी, यु.पी.एस.सी. मार्गदर्शक

वाचन ही केवळ ज्ञान प्राप्तीची प्रक्रिया नाही, तर ती आपल्याला जगाकडे पाहण्याची नवी दृष्टी देते, आपले विचार समृद्ध करते आणि व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत महत्त्वाची भूमिका बजावते. माझ्या वाचनाच्या प्रवासाची सुरुवात लहानपणीच झाली आणि त्यातून माझ्या आयुष्यात अनेक सकारात्मक बदल घडले.

लहान असताना, माझे बाबा घरी बरीच पुस्तके आणायचे. त्या काळात पुस्तक वाचणे हा आमचा मुख्य विरंगुळा होता. घरातील पुस्तकांच्या शेल्फवर गोष्टींची पुस्तके, अकबर-

बिरबल आणि तेनाली रामाच्या कथा, चाचा चौधरी आणि चंपक यांसारखी मासिके नेहमीच असायची. त्यातील रंगीबेरंगी चित्रे आणि कॉमिक्समुळे वाचनाची आवड वाढत गेली. त्यातून वाचनाची सवय विकसित झाली आणि नवीन गोष्टी जाणून घेण्याची उत्सुकता निर्माण झाली.

जसा मी मोठा होत गेलो, तसा वाचनातील आवडींमध्ये बदल होत गेले. लहानपणी गोष्टींच्या पुस्तकांवर प्रेम असतानाच, वयानुसार कादंबऱ्या आणि नॉन-फिक्शन पुस्तकांकडे माझा कल वाढला. विविध विषयांवरील पुस्तके वाचण्याची इच्छा झाली. त्यातून मला समाज, इतिहास, विज्ञान आणि तत्त्वज्ञान यांबद्दल अधिक माहिती मिळाली.

वाचनातील सर्वात मोठा बदल तेव्हा झाला, जेव्हा मी स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू केली आणि सारख्या परीक्षांसाठी अभ्यास करताना, मी ठराविक विषयांची निवड करून वाचन करू लागलो. स्वतःचे मत तयार करणे हा एक महत्त्वाचा प्रयत्न होता. अभ्यासाला समांतर असणारी अनेक पुस्तके वाचण्यात आली. एक काळ असा होता, जेव्हा दिवसातून १०-१२-१४ तास वाचन होत असे. त्यातून टिपणे काढणे, विचार मांडणे आणि ज्ञानाची खोली वाढवणे हे काम चालू होते.

स्पर्धा परीक्षांच्या तयारी दरम्यान केलेल्या वाचनाचा माझ्यावर सर्वांत जास्त प्रभाव पडला. त्यातून विचार करण्याची एक ठराविक दिशा मिळाली. निर्णयांच्या परिणामांना असू शकणारे अनेक कंगोरे लक्षात येऊ लागले.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, आयुष्यातील अनेक अडचणी आणि संघर्षांसाठी लढण्याची तयारी त्यातून झाली. वाचनाने मला जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची ताकद दिली.

लेखकांपेक्षा इतिहास आणि तत्त्वज्ञानाच्या पुस्तकांचा माझ्यावर विशेष प्रभाव पडला. आत्मचरित्रेदेखील अनेक दृष्टींनी प्रेरणादायी ठरली. विशेषतः ''एक होता कार्व्हर'' या पुस्तकातून संघर्ष करत राहण्याची अत्यंत महत्त्वाची शिकवण मिळाली. या पुस्तकाने मला समजावले की जीवनात कितीही अडचणी आल्या तरीही त्यांचा सामना करण्याची तयारी ठेवली पाहिजे.




एका टप्प्यावर, मी सामाजिक कार्यांमध्ये रस घेऊ लागलो. संघटनेची बांधणी करताना, पुस्तकांमधून जमा झालेले अनेक अनुभव मदतीला आले. अनेक व्यावसायिक संधीदेखील फक्त आणि फक्त वाचनामुळेच मिळाल्या, असे मला वाटते. माझ्या कामातील बराच मोठा भाग लेक्चर्स घेण्याशी संबंधित आहे. त्यातही वाचन हा अविभाज्य भाग आहे. अनेक वेळा वर्गात देण्यासाठी काही खास उदाहरणे वाचनामुळेच मला माहीत झालेली असतात.

वाचनाच्या या प्रवासाने माझ्या व्यक्तिमत्त्वात अनेक सकारात्मक बदल घडवले. मी अधिक संवेदनशील आणि

सहानुभूतीशील झालो. विचार करण्याची क्षमता वाढली. संवाद कौशल्यात सुधारणा झाली आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, मी एक आजीवन विद्यार्थी झालो.

आजच्या स्पर्धेच्या युगात आणि सारख्या परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अवांतर वाचनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. केवळ अभ्यासक्रमातील पुस्तकांपुरते मर्यादित न राहता, विविध विषयांवरील पुस्तके वाचल्यास ज्ञानाची व्याप्ती वाढते. विचारांची खोली वाढते. निर्णय घेण्याची क्षमता विकसित होते. जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची ताकद मिळते.

अवांतर वाचनामुळे तुम्ही केवळ परीक्षांसाठीच नव्हे, तर आयुष्यासाठीदेखील तयार होता. वाचनाने मिळणारे ज्ञान, अनुभव आणि प्रेरणा हे अमूल्य आहेत. त्यामुळे, माझ्या अनुभवावरून मी तुम्हा सर्वांना आवाहन करतो की, आपल्या वाचनाची व्याप्ती वाढवा. विविध विषयांवरील पुस्तके वाचा. आत्मचरित्रे वाचा. इतिहास, तत्त्वज्ञान, विज्ञान, साहित्य अशा विविध शाखांमध्ये डोकवा. तुमच्या व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत वाचनाचा खूप मोठा वाटा असेल.

शेवटी, वाचन हे केवळ ज्ञानाचे साधन नाही, तर ते आपल्याला एक चांगला माणूस होण्याची शक्ती देते. त्यामुळे, वाचनाची सवय जोपासा आणि तुमच्या आयुष्याला एक समृद्ध दिशा द्या.

# माझं वाचन माझं आकलन



प्रा.डॉ. सागर कुलकर्णी

बदल आणि अनिश्चितता हेच आजचे वास्तव आहे. सध्याचा काळ हा प्रचंड धकाधकीचा, तीव्र स्पर्धेचा, मूल्यात्मक पडझडीचा आणि गुणात्मक बदलांचा आहे. तंत्रज्ञानाने आपल्या जाणिवांच्या कक्षा रुंदावत नेलेल्या आहेत. कधीकधी कृत्रिम प्रज्ञा, नवीन तंत्रज्ञान माणसाला एकीकडे अस्वस्थ करते; तर दुसरीकडे उल्हासितही करत असते. तसं पाहता या परस्पर विरोधी प्रतिसादामधून आपल्या भावाविश्वाला, आकलनाला नकळतपणे आव्हाने

सध्या उभी होत आहेत. आज फेसबूक, इंस्टाग्राम आणि इंटरनेटसारख्या अत्यंत वेळखाऊ माध्यमांमुळे प्रत्येकच व्यक्तीचे वाचन हे कमी झाले आहे. माध्यमे, जाहिराती, डिजीटल सेवा, सायबर विश्व या सगळ्या बदलांमधून आज प्रचंड प्रमाणात माहितीची त्सुनामी आलेली आहे. या सगळ्या भाऊ गर्दीतून वाचनासाठी मुद्दाम वेळ काढावा आणि निवांतपणे आपण वाचन-चिंतन-मनन करावे आणि वाचनाचा निखळ आनंद घेत पुढे जावे असे फारसे होताना आता दिसत नाही.

जग ही तर एक बाजारपेठच आहे. प्रत्येकाला आपले सत्त्व टिकून ठेवण्यासाठी या गळेकापू स्पर्धेमध्ये कालानुरूप स्वतःमध्ये बदल करावे लागतात. कार्यक्षमता सातत्याने सिद्ध करून ती वाढवावी लागते. या सगळ्यांच्या तळाशी आपल्या जीवनाचा जो महामार्ग आहे, तो अधिक सुकर आणि समाधानी होण्यासाठी आजही वाचनाला पर्याय नाही. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजेबरोबरच माणसाची वाचन हीसुद्धा गरज आहे. जसजसा माणूस प्रगत होत गेला, तसतसा तो विविध शास्त्रांचा शोध लावत गेला, अनेक प्रश्नांची उत्तरे तो शोधू लागला. अनेक आव्हानात्मक परिस्थितीशी तो झगडू लागला. हे सगळं होत असताना माणूस नकळतच पुढच्या काळामध्ये अभिव्यक्त होऊ लागला. त्यासाठी वेगवेगळ्या भाषा, मौखिक परंपरा, लिखित परंपरा निर्माण होऊ लागल्या. कागदाचा वापर सुरू झाला. प्रिंटिंग प्रेसचा शोध लागला. पुढे संदेशवहनाचे युग

अवतरलं. हे सगळं होत असताना एकीकडे लोक प्रचंड प्रमाणामध्ये लिहू लागले होते, वाचू लागले होते आणि एकमेकांशी संवादही साधू लागले होते. हे सगळं ज्या वेळेस आपण समजून घेतो, त्या वेळेस आपल्याला वाचन ही माणसाच्या उत्क्रांतीमधील अतिशय क्रांतिकारी घटना आहे असे लक्षात येते.

वाचन ही जाणीवपूर्वक करण्याची कृती आहे, असे मला वाटते. पुस्तकांचे वाचन आपल्याला भवतालाची सजग आणि डोळस ओळख करून देते. आपली भवतालाबद्दलची समज वाढवते. वाचन हे साहित्याची, माणसाबद्दलची, परिस्थिती, घटना, अनुभव यांची जाण आपसूकच वाढवत नेते. पुस्तकांचे वाचन आपल्याला समृद्ध करते. समृद्ध होणं म्हणजे काय? तर आपल्याला जगण्याकडे आणि जगाकडे बघण्याचा साहाय्यक दृष्टीकोन विकसित करायला आपल्याला मदत करते. आपल्या विचारांना अधिक प्रगल्भ करायला सातत्याने मदत करते.

आपण जसजसं वाचत जातो, तसतसं आपण वाचनविषयक स्वतःच्या क्षमता वाढवत जातो, वाचनविषयक दृष्टिकोन आणि वाचनाबद्दलची उत्सुकतादेखील नक्कीच वाढत जाते. वाचन माणसाला अंतर्मुख, विचारी आणि विवेकी व्हायला मदत करत असतं. वाचन ही एक आनंददायी प्रक्रिया आहे. ज्ञानाची भूक प्रत्येकाला असते, ती खूप महत्त्वाची असते. आपल्या प्रत्येकाचं आकलन वाढवत नेणं आणि तेही सजगपणे

वाढवणं हे वाचनामुळेच शक्य होत असते.

वाचन ही एक प्रयत्नपूर्वक करायची प्रक्रिया आहे. वाचन या अतिशय महत्त्वाच्या, गंभीर आणि जगण्यात गंमत आणणाऱ्या कृतीविषयी अनेकांना उत्सुकता असते. माणसाचं जग आणि त्या माणसाचं वाचन यातला परस्पर अनुबंध समजून घेणं खूप महत्त्वाचं आहे. माझ्या वाचन सवयींबद्दल सांगायचं झालं तर तिसरी-चौथीपासूनच मी पुस्तकं वाचायला लागलो. घरची परिस्थिती अत्यंत बिकट, ओढग्रस्ततेचीच होती. तरीही माझा फोकस हा वाचनावरच राहिलेला आहे. असं सगळ असताना आमच्या घरामध्ये नियमितपणे एक वृत्तपत्र यायचं. त्या वृत्तपत्रातूनच वाचनाची आवड जुजबी स्वरूपाची निर्माण झाली होती. त्या वेळी हातात पडेल ते वाचण्याची जणू सवयच जडली. परिस्थितीशी दोन हात करताना नकळतपणे घरातून नाही; मात्र शाळेत त्या वेळेस भेटलेल्या शिक्षकांमुळे वाचन संस्कार होत गेले. अभ्यासात मी नावाजलेला विद्यार्थी होतो. शाळेतील वातावरण तेव्हा वाचनाला, लेखनाला प्रेरणा देणारे होते, हे मात्र आज फार नवल वाटण्यासारखे आहे. त्या काळी असणारे शिक्षक हे अत्यंत प्रयोगशील वृत्तीचे आणि सामाजिक बांधिलकी मानणारे असे होते. शाळेमध्ये असणारे साहित्यविषयक उपक्रमशील शिक्षक आणि त्यांचे वैयक्तिक लक्ष यांमुळे माझ्यासारखे अनेक जण त्या काळी भारावून गेले होते. शिक्षकांनी केलेल्या वाचन संस्काराचे ठसे माझ्या जीवनात तरी अमिट असेच राहिले आहेत.

शाळेमधील शिक्षक हे मुलांना लिहिते–बोलते करण्यासाठी सतत मेहनत घेत असत आणि त्यांना दाद देणारे विद्यार्थी, तेव्हा स्वाभाविकपणे पुढे येत असत. शाळेतील शिक्षक स्वतः आम्हांला पुस्तके वाचण्यासाठी उद्युक्त करायचे. शाळेतील ग्रंथालय खूप समृद्ध होते. मी दहावीपर्यंत व्यंकटेश माडगूळकर, पु.ल. देशपांडे, द.मा. मिरासदार, रा.रं. बोराडे, नारायण धारप, गो.नी.





दांडेकर, व.पु. काळे, प्रकाश नारायण संत, बाबासाहेब पुरंदरे, ना.सी. इनामदार यांचे साहित्य वाचून काढले होते. वर्गामध्ये आम्हांला हेच शिक्षक सातत्याने कवितांना चाली लावायला शिकवायचे आणि या चाली लावण्यामधूनच कविता वाचनामधली गंमत कळायला लागली. कविता समजायला लागली. कवितेबद्दल प्रेम, आवड निर्माण झाली. माझे वाचनाचे टप्पे पुढे विविध पद्धतीने मला सांगता येतील. लहानपणापासूनच असलेली वाचनाची सवय पुढे कॉलेज वयात एका विशिष्ट वातावरणामुळे वाढत गेली. तेव्हा होणाऱ्या आंतरमहाविद्यालयीन वादविवाद, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा यासाठी तयारी म्हणून आम्हांला महाविद्यालयात



काही अधिकची पुस्तके दिली जायची. प्राध्यापक मंडळी अतिशय मेहनतीने आमची तयारी करून घ्यायची. एकपात्री अभिनयासाठी, कथाकथनासाठी काही पुस्तकं ही कॉलेजमधूनच आवर्जून दिली जात असत. यातूनच मग साहित्य व्यवहाराकडे पाहण्याचा दृष्टिकोन महाविद्यालयातच तयार होत गेला, असे म्हणता येईल. महाविद्यालयातच साहित्याबद्दलची आणि जीवनाबद्दलची माझी जाण अधिकाधिक विकसित होऊ लागली. अनेक स्पर्धांमधून मी लिहिता-बोलता राहिलो. दरम्यान कथा, ललित लेख, माहितीपर लेख हे वेगवेगळ्या वृत्तपत्रांमधून आणि मासिकांमधून छापून यायला लागले होते. महाविद्यालयातील प्राध्यापकांशी झालेल्या चर्चा या माझी साहित्यविषयक समज विकसित करणाऱ्या होत्या. साहित्याकडे अधिक जागरूकपणे पाहण्याचे महाविद्यालयातच शिकता आले. आकाशवाणीसाठी अनेक वर्ष मी सातत्याने लिखाण करू लागलो. कथा लिहू लागलो. मी पुरेसा स्वतःला आणि वाचनाला वेळ देऊ लागलो होतो. मी वाणिज्य शाखेचा असतानाही साहित्याच्या प्रेमापोटी अनेक साहित्य संमेलनांना, कवी संमेलनाला, कथाकथन उपक्रमांना उपस्थित राहू लागलो. पुस्तकांवर स्वतंत्रपणे लेख लिहू लागलो. हे सगळं करत असताना वाचनाचा रियाज

माझा कुठेही कमी पडत नव्हता. यातूनच पुढे आपले कुठेतरी काहीतरी छापून येते आहे, याचा आनंद त्या काळी फार होत होता. मला माझ्या वाचनाचा, वेगवेगळ्या संदर्भांचा नवीन अर्थ प्रत्येक वेळी उलगडत गेलेला आहे. कथा, माहितीपर लेख, प्रासंगिक लेखन, वृत्तपत्रीय समीक्षा अशा प्रकारचे लेखन मी सातत्याने करत आलेलो आहे. लेखक त्याच्या लेखणीमधून आपल्या बोटाला धरून जगाची सफर घडवत असतो. ही खूप रंजक प्रक्रिया असते. आजचा वाचक हा उद्याचा लेखक असतो, असे सातत्याने म्हटले जाते. वाचता वाचता वाचकही लेखक होतो याचा अनुभव मला आलेला आहे.

पुढे पदव्युत्तर शिक्षण घेताना आपसूकच वाचन अधिक सखोल आणि गंभीरतेने ठरवून करता आले. एक एक लेखक पूर्ण वाचून काढणे शक्य होऊ लागले. या वाचन सवयीतूनच मी मेहनतीने पदव्युत्तर वर्गात सर्वप्रथम आलो. पुढे विद्यापीठात एम.फिल. आणि पीएच.डी.च्या संशोधनामुळे एकूणच अभ्यासाला आलेली शिस्त, त्याचा आपल्या वाचन प्रक्रियेमध्ये झालेला वापर यामुळे स्वतःमध्ये बदल होत गेले. वाचन अधिक विविधांगी होण्यास मदत झाली. एकीकडे विषयाचे वाचन आणि दुसरीकडे साहित्याचे वाचन हा प्रवास माझ्यासाठी खूप मोठा आणि दीर्घ पल्ल्याचा भाग



राहिलेला आहे. तसं पाहिलं तर मी स्वतःला फार व्यासंगी वाचक अजिबात म्हणणार नाही. ती आत्मप्रौढी ठरेल. माझे वाचन हे विविधांगी आहे, याची कबुली मात्र मी देतो आणि मी पट्टीचा वाचक आहे, याची नम्र जाणीव मात्र मला आहे.

आताच्या या तंत्रज्ञानाच्या काळात माझे वाचन बऱ्यापैकी आहे. माझ्या आजूबाजूला असणाऱ्या अनेक लोकांमुळे मला ही वेळोवेळी वाचनाची गोडी वाढायला, वृद्धिंगत करायला खरोखरच मदत झालेली आहे. मध्यंतरी कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक यांच्या साहित्यभूषण या परीक्षेनिमित्ताने माझ्या वाचनाचा आवाका वाढायला खूप मदत झाली. कथा, कविता, कथात्मक साहित्य, नाट्य साहित्य, कादंबरी, समीक्षणात्मक, माहितीपर, संगीतविषयक, संगणकविषयक, तंत्रज्ञानविषयक, अर्थशास्त्र हा तर जिव्हाळ्याचा विषय असल्याकारणाने, व्यवस्थापनविषयक, संत साहित्यविषयक अशी अनेक अनेक पुस्तक मी मागच्या काळामध्ये वाचत आलेलो आहे.

वाचन हे माणसाच्या कक्षा रुंदावत असतं. आपल्या आयुष्यात आपण अनेक प्रश्नांना भिडत असतो. या प्रश्नांची उत्तरं आपल्याला नकळतपणे वाचनांमधून मिळत असतात. मी महाविद्यालयात शिकवत असल्याकारणाने सतत प्रयत्नपूर्वक आपल्या वाचनाच्या कक्षा उन्नत कराव्या लागतात, यासाठी सतत प्रयत्नशील राहावे लागते. अनेक ठिकाणी बोलावे लागत असल्याकारणाने भाषणांना संदर्भ पुरवण्यासाठी सातत्याने वाचन करणे हे गरजेचे असते.

बाजारपेठेमध्ये आलेले नवीन पुस्तक लवकर वाचून पूर्ण होते. मी अनेक नाटकांमधून काम केल्यामुळे मला या माझ्या वाचनाचासुद्धा खूप फायदा झालेला आहे. यातूनच अभिवाचनाचे अनेक कार्यक्रम सादर करता आले. अभिवाचनाची संहिता निर्मिती ते प्रयोग यात वाचनाची मदत झाली. कथात्मक साहित्यामध्ये फडके, खांडेकर, गाडगीळ, विद्याधर पुंडलिक, जी.ए. कुलकर्णी, खानोलकर यांच्यापासून आताच्या पिढीचे किरण येले यांच्यापर्यंत, तसेच श्रीनिवास विनायक कुलकर्णी, आशा बगे, सानिया, कमल देसाई, व्यंकटेश माडगूळकरांपासून ते भारत सासणे, सदानंद देशमुख यांच्यापर्यंत, हिंदीमध्ये कथाकार प्रेमचंद, लेखिका कृष्णा सोबती असतील यांचं तर झपाटून वाचावे असेच साहित्य आहे. कवितेमध्येसुद्धा केशवसुत, भा.रा. तांबे, इंदिरा संत, शांता शेळके यांच्यापासून नारायण सुर्वे, वसंत बापट, ग.दि. माडगूळकर, मंगेश पाडगावकर, अरुणा ढेरे ते आताच्या नीरजा, प्रवीण दवणे यांच्या कवितेपर्यंत असे विविधांगी वाचन मी अतिशय मनसोक्त करत आलेलो आहे. दर वर्षी मी जवळपास ४५-५० दिवाळी अंक दोन महिन्यात वाचून संपवतो.

वाचनाला कुठल्याच काळात पर्याय उपलब्ध नसणार आहे. मोबाईल, कम्प्युटर, वेबसिरीज, इंस्टाग्राम हे फारच त्रोटक, जुजबी आणि तकलादू स्वरूपाचे पर्याय आहेत. आपल्याला जबाबदार नागरिक म्हणून जगत असताना आपले जीवन चांगले करण्यासाठी प्रथमतः आपला विचार

हा विवेकी आणि समंजस असा असला पाहिजे, यासाठी वाचन ही प्रक्रिया अत्यंत उपयुक्त आहे. वाचनासारख्या मूलभूत गोष्टीला चांगले दिवस येण्यासाठी सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. काय वाचावं आणि कसं वाचावं याबद्दल सातत्याने चर्चा होत असतात, मात्र आपण वाचत गेल्यास आपल्याला आपली वाट सापडत जाते.

आता जागतिकीकरण येऊन स्थिरावलेल्याही बराच काळ लोटून गेला आहे. माणसाचे जगण्याचे आडाखे बदलून गेले आहेत. समाज माध्यमांच्या जाळ्यात नकळत माणूस अडकत चालला आहे. आपले जीवन अनेकरंगी, बहुरंगी, आत्मकेंद्री, वेगवान, चंगळवादी, एकटेएकटे, विसंवादी, तणावग्रस्त असे होत आहे. जगण्यातून एक प्रकारची कृत्रिमता, निर्जीवता अकारण पुढे येत आहे. हे सगळे तुटलेपण माणसाला बधीर करण्याकडे नेत आहे. दीर्घकाळपर्यंत माणसे दिवसभरात खूप वाचत होती. आता मात्र आपण पुस्तकांच्या जागी चटकदार रिल्स बघण्यात रमत चाललो आहोत. अभिजात, आशयघन, विचारप्रवृत्त, चिंतनशील अंतर्मुख करणारे गंभीर साहित्याबद्दल समाजामध्ये आस्था शिल्लक राहिलेली नाही.

आपली अभिरुची संपन्नता वाढवायची असेल तर आपल्याला वाचन केलेच पाहिजे. माणसाने पुस्तकांना जवळ केले तर जगणे हे अधिक सुखकारक आणि समाधानी होण्यास फारसा वेळ लागणार नाही. वाचनाबद्दलची बांधिलकी आणि निष्ठा कमी होत चाललेल्या काळामध्ये,

वाचन मंदावत चाललेल्या काळामध्ये वाचन चालू ठेवणे ही अत्यंत निष्ठेने व्रत घेऊन करण्याची गोष्ट आहे. कुठल्याही काळामध्ये पुस्तकं ही दीपस्तंभासारखी मार्ग दाखवत असतात. एकाच आयुष्याच्या तुकड्यांमध्ये आपण वाचनाच्या माध्यमातून अनेक लोकांचे जीवन त्यांच्या व्यथा, वेदना, संवेदना, सुख, दुःखे समजून घेत असतो यासाठी वाचनाचा झपाटा वाढवत नेणे निकडीचे असते. आजच्या पिढीला वाचनाकडे वळवणे गरजेचे आहे असे म्हणताना हे ध्यानात घेतले पाहिजे की, घोड्याला पाण्यापाशी नेता येतं, तो तहानलेला नसेल तर जबरदस्तीने आपण त्याला पाणी पाजू शकत नाही. यासाठी आपण आजच्या तरुण मुलामुलींना आवडतील असे विद्यालयीन, महाविद्यालयीन उपक्रम घेऊन साहित्य आणि वाचन याबद्दल त्यांची मानसिकता समजून घेऊन, सभा, छोटीछोटी साहित्य संमेलने, चर्चा, परिसंवाद सतत आयोजित केले पाहिजेत यातूनच लेखन आणि वाचनाची इयत्ता वाढू शकेल.

साहित्याचा खरा वाचक हा कुठल्याही काळात वाचन ही सवडीची गोष्ट नसून आवडीची आहे यावर विश्वास ठेवणारा असतो. ज्याला वाचनाची आवड आहे तो वाचण्यासाठी सवड काढतोच. बदलत्या काळात वाचनाची ओढ कमी होणार नाही हे मात्र खरे. प्रत्येकाला वाचनासाठी लागणारी उर्मी, अंतस्थ प्रेरणा अविरत लाभो या सदिच्छा!

# माझी पुस्तकांसोबतची जडणघडण



सौरभ नाईक
वृत्तनिवेदक, NDTV मराठी

कोणतीही पिढी जेव्हा वाचू लागते, तेव्हा त्या पिढीवर होणारे वाचन संस्कार हे आधीच्या पिढीने काय संस्कार दिले आहेत यावर अवलंबून असतात. म्हणूनच आताची युवा पिढी जे काही वाचत असेल त्याची पाळंमुळं आधीच्या पिढीत रुजली गेली आहेत. सुदैवाने आम्हा युवा पिढीला चांगल्या वाचनाचे संस्कार लाभले. जग कितीही आधुनिक झालं असलं तरी याबाबतीत आम्हा युवा पिढीला नशीबवानच म्हणावं लागेल की आमच्या बालपणी स्मार्टफोन्स नव्हते. त्यामुळे मनोरंजन म्हणून का होईना पण

पुस्तकं हाती पडली आणि आयुष्याचं सोनं झालं. माझ्या घरी लहानपणापासूनच पुस्तकांचा भरणा होता. शाळेत गेल्यापासून मराठी विषय आपल्याला जास्त रुचतोय असं वाटू लागलं तेव्हापासून कळत नकळत वाचन सुरू झालं असावं असा माझा अंदाज आहे. कारण धडे वाचायला आवडायचे, कविता वाचायला आवडत असे. मला स्पष्ट आठवतं.. एक सबंध उन्हाळ्याची सुट्टी मी पुलंचं लिखाण वाचून काढलं आहे. कदाचित सहावी सातवी मधली गोष्ट असावी आणि सुदैवाने पुलं आधी हाती पडले हे बरं झालं. कारण लिखाण विनोदी आणि प्रवाही. त्यामुळे शाळकरी मुलाला कंटाळा येईल असं काहीच नाही. मग कळायला लागलं की पुस्तकात मजा असते. घरी पुलंची सगळी पुस्तकं होती, अजूनही आहेत. पुलं सगळे वाचून झाल्यानंतर म्हटलं आता काहीतरी वेगळं वाचायला हवं. पण काय वाचावं कळत नव्हतं. शिक्षकांना विचारलं. म्हणाले, 'अग्निपंख' वाच. जसा आता एकेक गाण्याचा ट्रेण्ड असतो, तसा पुस्तकांचा ट्रेण्ड असण्याचे ते दिवस! बाबांनी एकदा चांगले मार्क मिळाल्यावर विचारलं काय पाहिजे, म्हटलं 'अग्निपंख'. दुसऱ्या दिवशी पुस्तक घरी होतं. यात पालकांची भूमिका देखील महत्त्वाची होती. अग्निपंख वाचून



काढलं. आयुष्यात पुलंव्यतिरिक्त पहिलं काही वाचलं गेलं असेल तर अग्निपंख. मग एकदा पुस्तकांची गोडी कळायला लागली आणि झपाटल्यासारखा वाचत सुटलो. त्या काळी शाळेत वार्षिकोत्सवात भेट म्हणून म्हणा किंवा नातेवाईक घरी आले की पुस्तकं देण्याचा प्रघात होता. हे जे त्या काळी वगैरे चाललं आहे हे फार जुनं नसून साधारण १२–१५ वर्षांपूर्वीची गोष्ट. पण आजच्या युवा पिढीला 'आमच्या काळी' हा शब्द वयाच्या फार सुरुवातीला वापरायला लागतोय याचं कारणच थोड्याशा वर्षात काळ झपाट्याने बदलला आहे. तर मग ही वाचनाची आवड वाढत गेली. पुलं अनेकदा पुन्हा पुन्हा वाचले जायचे. पण मग महाराजांचा इतिहास आवडतो म्हणून श्रीमान योगी कादंबरी आयुष्यात आली, राजा शिवछत्रपती अशा अनेक




ऐतिहासिक कादंबऱ्या वाचल्या गेल्या. वाचकाची एक 'फेज' असतं, असं मला कायम वाटतं. म्हणजे ऐतिहासिक पुस्तकं वाचण्याचा सपाटा लावला की मग ऐतिहासिकच वाचलं जातं. म्हणजे स्वराज्य स्थापनेपासून सुरूवात केली ती थेट स्वातंत्र्योत्तर काळात असलेला भारत, महाराष्ट्राची परिस्थिती जाणून घेण्यासाठी श्रीमान योगीपासून सुरुवात केली, मग 'संताजी', 'छावा', 'राऊ', 'पानिपत',

'मंत्रावेगळा', 'दुर्दम्य', 'सावरकर', 'महानायक', 'सत्त्याचे प्रयोग' या क्रमाने वाचत गेलो. मग एकदा पौराणिक कथांची गोडी लागल्यावर जया, सीता, मिथक, शिवा ट्रायलॉजी अशा पद्धतीची पुस्तकं वाचण्याचा सपाटा लावला. हीच वाचकाची 'फेज' असते असं म्हणावं लागेल आणि जेव्हा अशा क्रमाने वाचण्याचा कंटाळा येऊ लागतो, तेव्हा अधूनमधून एका बैठकीत संपवता येतील अशी पुस्तकं वाचावी लागतात. जशी की 'मुंबईस्तान', 'ब्रँडनामा', 'अवलिये आप्त', 'गोठणातल्या गोष्टी', 'कहाणी लंडनच्या आजीबाईची', वगैरे. बऱ्याचदा एखादा सिनेमा आल्यावर त्याचं मूळ पुस्तक वाचण्याचा मोह आवरत नाही, उदा. 'दुनियादारी' किंवा 'चंद्रमुखी'. या सगळ्यामध्ये एक वेगळेपण टिकवून ठेवलं किंवा ज्या पुस्तकाचा प्रभाव कायम राहिला तो म्हणजे तुंबाडचे खोत. ही कादंबरी अफाट आहे. ह्याचा प्रभाव जास्त टिकून राहिला, कारण ही कथा जिथे घडते तिथे मुद्दाम या पुस्तकाच्या निमित्ताने जाणं झालं. तिथे हे सगळं अनुभवलं. तिथे एक वेगळा साहित्यिक खजिना मिळाला. या पुस्तकाची पहिली प्रत पाहायला मिळाली, जिथे पुस्तक प्रकाशन झालं, ती जागा, तिथले फोटोज् पाहायला मिळाले, हा एक वेगळा अनुभव होता. फिल्म मेकिंगची आवड



असल्याने 'सिनेमास्कोप', 'सिनेमॅटिक', 'शॉर्टकट', 'पथेर पांचाली' अशी काही पुस्तकं वाचली. सध्या ज्या वृत्तनिवेदकाच्या भूमिकेत आहे, त्याचा अभ्यास म्हणून अनेक राजकीय विषयक पुस्तकं वाचण्याचा पण योग आला. आणि साहजिकच 'युगंधर', 'मृत्युंजय', 'कोसला' अशी जी कालातीत पुस्तकं आहेत ती तर वाचलीच पाहिजेत. थोडक्यात काय, तर वाचन चतुरस्त्र हवं. आपण ज्या क्षेत्रात आहोत त्यादृष्टीने तर हवंच; पण आपण ज्या क्षेत्रात नाहीत त्याचंही हवं. दुकानावरच्या पाट्या वाचणं हेही वाचनच आहे की, भेळ घेतल्यावर मागे उरलेला कागद वाचणं हेसुद्धा वाचनच आहे. एवढंच कशाला, माणसं वाचणं हासुद्धा वाचनाचाच एक प्रकार आहे. आपण काय वाचतो आणि कुठे वाचतो पेक्षाही जास्त महत्त्वाचं आपण वाचतो हे आहे असं मला वाटतं. वाचत राहिलं पाहिजे.. कारण, कागदांपलीकडचे शब्द वाचायला शिकल्याशिवाय कागदावर शब्द उतरवता येत नाही.



# मी काय वाचते?
# मी का वाचते?



**डॉ.तन्वी बांबोळकर**
**साहाय्यक प्राध्यापक (इंग्रजी)**

विसाव्या शतकाचा अंत आणि एकविसाव्या शतकाची सुरुवात यांसारख्या बदलत्या जगात जन्माला आलेली आणि मोठी झालेली आमची मिलेनियल पिढी. गोव्याच्या लहानशा गावात वाढलेल्या आणि घरात वाचनाचं वातावरण असल्यानं लहानपणातच पुस्तकांशी मैत्री जुळली. ‘रंगतदार गोष्टी’, ‘रामायण’ वाचनाच्या दरम्यान ‘चंपक’ सारख्या मासिकांचा लळा लागला. वयात येताना आपल्याला ‘कोंकणी माणूस’ असल्याची जाणीव झाली आणि आपल्या भाषेतले साहित्य वाचायला हवे या जाणीवेने कोंकणी

भाषेतल्या काही नामांकित कादंबऱ्या वाचल्या.

आपल्या भाषेतले साहित्य वाचलं पाहिजे या जाणिवेने खूप कमी वयात कोंकणी भाषेतल्या काही नावाजलेल्या कादंबऱ्या वाचल्या. पुंडलिक नाईक यांची गोव्यातल्या खाण व्यवसायामुळे लोकजीवनावर झालेल्या परिणामाची हृदयभेदक कहाणी सांगणारी 'अच्छेव', ज्ञानपीठकार दामोदर (भाई) मावजो यांची गोव्यातील कॅथोलीक समाजातील पोटाच्या भरीसाठी गाव सोडून गल्फला जाऊन कष्ट सोसणाऱ्या स्त्रीच जीवन चितारणारी 'कार्मेलिन' आणि भौगोलिकरित्या जरी कर्नाटकमध्ये असलं, तरी सांस्कृतिक नजरेने 'कोंकणी' असणारं कारवार हे शहर आणि त्या नजीक असलेल्या गाव जीवनाची




दु:खद कहाणी सांगणारी सरस्वती सम्मान प्राप्त महाबळेश्वर सैल यांची 'काळी गंगा' वाचून काढली. पुढे इंग्रजी साहित्याचे शिक्षण झाल्यामुळे इंग्रजी साहित्याशी आणि जागतिक साहित्याशी ओळख झाली. आज मी केंपे महाविद्यालयात इंग्रजी विषय शिकवते, पण लेखन कोंकणी भाषेत करते. त्यामुळे वाचन करताना भाषेचे बंधन कधीच घालून घेतले नाही. त्यामुळे माझं नुकतं लिहिलेलं नाटक 'हिडींबा' जरी गोव्याच्या लोककलेवर आधारित असलं तरी

'हिडींबा' या पात्राचे संशोधन करताना इंग्रजी आणि हिंदी भाषेतही साहित्य वाचलं. आजच्या काळात वाचनासाठी फक्त वाचनालय हेच माध्यम राहिलेले नाही तर आपल्या हातात असलेला मोबाईलही अनेक नवीन 'कंटेट' देतो. त्यामुळे 'वाचन' आता फक्त पुस्तकांचं होत नाही. माझ्या मते, जेव्हा एक युवा कोणतं तरी फिल्म किंवा इंस्टाग्रामवरचं रील बघतो, तेव्हा त्याच्या मनात आणि मेंदूत नवीन माहिती आणि मनोरंजनाची भर पडतेच. पण, आजच्या युवांनी बघितलेले 'कंटेट' हे खूपच कचऱ्याने भरलेले असू शकते. पूर्वीची पुस्तकं ज्या प्रकारे कार्यरत होती, त्याप्रकारे ही माध्यमं कार्य करायला लागली तरच त्याचा चांगला उपयोग होईल. काही युवा त्या प्रयत्नात आहेत, परंतु ते किती यशस्वी होत आहेत हे वेळच सांगेल.




इंग्रजी विषय शिकवल्यामुळे इंग्रजी साहित्य वाचन अनिवार्य ठरते. हल्लीच्या काळात वाचलेल्या काही पुस्तकांपैकी खूप आवडलेलं एक म्हणजे तेलुगु लेखक जी. कल्याणराव यांच्या 'अंतराणी वसंतम' या दलित कादंबरीचा 'अल्लाडी उमा' आणि एम. श्रीधर यांनी केलेला 'अनटचेबल स्प्रिंग' हा अनुवाद. आंध्र प्रदेशातील मळा आणि मडीगा दलित समुदायांची कहाणी सांगणारी ही

कादंबरी म्हणजे एक तऱ्हेची क्रांतीच आहे. निर्भीडपणे लेखक राव उच्चवर्णीयांनी दलित समाजाला किती त्रास दिला आहे याचे चित्रण केले आहे. दर वर्षी वर्गात ही कादंबरी शिकवताना जाती व्यवस्था, तिचा इतिहास आणि आजच्या काळात जात कितपत प्रभाव टाकते यावर चर्चा करता येते. त्यामुळे साहित्य एक कला-प्रकार न राहता समाज सुधारण्याचे माध्यम होते.




हल्ली 'ग्राफिक कादंबरी' हा साहित्य प्रकारदेखील युवांना आवडू लागला आहे. चित्र आणि कमी शब्दांत प्रभावी साहित्य निर्माण होऊ शकतं ह्याचं हे उदाहरण आहे. अमृता पाटील आणि देवदत्त पटनायक यांनी लिहिलेल्या 'अरण्यका' या ग्राफिक कादंबरीनं मला भुरळ पाडली. कात्यायणी, मैत्रेयी आणि गार्गी या वेद संस्कृतीतील तीन स्त्रियांच्या जीवनाचा आढावा घेताना या कादंबरीने मानवाची उत्पत्ती, त्याचा स्वभाव, त्याने स्वतःवर लादलेली बंधने आणि स्त्री-पुरुषांमधील संघर्ष यावर उत्तरं शोधण्याचा प्रयत्न केला आहे. अशा अनेक नव्या विचारांची पुस्तके आणि 'कंटेट' वाचायला मला आवडतं.

एक माणूस म्हणून घडताना, एक शिक्षक म्हणून घडताना

आणि आपण ज्या ठिकाणी जन्माला आलो त्या ठिकाणाची अस्मिता लोकांपर्यंत पोहोचावी आणि जागतिक प्रवाहाशी मिसळतानाच आपलं वेगळेपण टिकवून राहावं ह्या उद्देशातून वाचन करत आहे. माध्यमं बदलली आहेत, पण बदलत्या जगाचा आढावा घेत आणि कोणाच्या तरी संघर्षाचा वाटा होणारे साहित्य मनाला भावते. समाजातील विषमता दूर करण्यासाठी आणि नवीन युग सुरू करण्यासाठी अशा प्रकारचं साहित्यच युवा मन जागरूक करेल, अशी आशा आहे.

# वाचता वाचता..



पार्थ जोशी

वाचन ही एक सृजनशील प्रक्रिया आहे, असं मला वाटतं. केवळ क्रिया नव्हे, तर ती एक प्रक्रिया आहे. वाचन म्हणजे ढोबळ अर्थाने शब्द डोळ्यांखालून घालणं, अर्थबोध होणं इतकंच नाही तर ते आत झिरपत जाणं, त्याला स्वतःच्या विचार – चिंतनाची जोड असणं म्हणजे खरं वाचन अशी माझी समज आहे. आपल्याही नकळत आतमध्ये काही रुजवणारी, फुलवणारी, उजळवणारी ही प्रक्रिया. अशी प्रक्रिया जी माणसाला शब्दांप्रति डोळस करतेच सोबत आपली जगण्याची दृष्टी सुद्धा घडवत राहते. असं असताना



वाचन हा आयुष्याचा अविभाज्य भाग झाला नाही तरंच नवल! पण वाचन हा खूप मोठ्या प्रमाणत मांडायचा डाव कदाचित माझ्यासाठी नाही. अजूनतरी नाही. ती भातुकली असली, तरी त्यात रमून जाणं, ती आपल्यात आणि आपण तिच्यात रमून जाणं असा हा लोभस खेळ आहे. त्यात वस्तू आपल्या आवडीनिवडीच्या असतात. तशीच पुस्तकं बहुतेकदा अगदी निवडीची, कधीकधी माहीत नसलेली असतात.

कधीकधी वाचन हे लेखक ठरवून केलं जातं, कधी साहित्याचा प्रकार ठरवून तर कधी विषय ठरवून. हे ठरवणं प्रत्येक वेळी वेगळं असतं कारण आपली वाचनाची भूक प्रत्येक वेळी निराळीच असते. किंबहुना वाचणारे आपण सुद्धा वेगळेच तर असतो. वाचनाचे हेतूसुद्धा बदलत राहतात. कधी केवळ आनंदासाठी, कधी अभ्यास, केव्हा कुतूहल, अशी कारणं कितीही असली, तरी पुस्तकांजवळ जाणं हा आनंदच असतो. कविता वाचायची असेल तर दर



वेळी वेगळा कवी, वेगळं पुस्तक लक्ष वेधून घेतं; पण अरुणा ढेरे, शांता शेळके, वैभव जोशी यांच्या कवितांचं अढळ गारुड नाकारता येणार नाही. यांच्या कविता फार जिव्हाळ्याने वाचल्या जातात. आरती प्रभू, ग. दि. माडगूळकर, इंदिरा संत, पद्मा गोळे, प्रवीण दवणे, गुरू ठाकूर, आश्लेषा महाजन, अंजली कुलकर्णी, संगीता बर्वे अशी कितीतरी नावं सांगता येतील ज्यांच्या नव्या-जुन्या कविता आवर्जून वाचाव्याशा वाटतात. एखादा उल्लेख करायचा तर रक्तचंदन हा आश्लेषा महाजन यांचा कवितासंग्रह कमालीच्या वेगळ्या जाणिवांनी उजळवणारा आणि शब्दांची घडीव आरास दाखवून त्याच्या प्रेमात पाडणारा आहे. सद्य स्थितीत सामाजिक वास्तवाच्या विद्रोही वगैरे कविता लिहिण्याचं प्रमाण फारच वाढत असलं, तरी अशा किंवा टाळ्यांच्या कविता वाचण्यापेक्षा अंतर्मुख करणाऱ्या कविता, आतल्या स्फुल्लिंगाची उत्कट चमक असलेल्या कविता, सूचकता आणि अलंकारांचा सम्यक वापर असलेल्या कविता आणि ज्या वाचून शब्दांचा मोह वाढावा आणि अर्थांच्या निराळ्याच वाटा गवसून जाव्यात अशा कविता चवीने वाचायला आवडतात. कवितेची सायसाखरेची पाऊलवाट ललित लेखनाच्या प्रशस्त

मार्गाकडे कधी नेते हे कळतंही नाही. ललित लेखनात डॉ. रा. चिं. ढेरेंपासून ते अगदी रामचंद्र देखणे, अरुणा ढेरे, प्रवीण दवणे, आश्लेषा महाजन, राम शेवाळकर, प्रा. शिवाजीराव भोसले, सुहासिनी इर्लेकर, मिलिंद जोशी अशी अनेक नावं आहेत. 'ललितबंध' हे डॉ. ढेरे यांचं पुस्तक प्रचंड आवडलेल्या पुस्तकांपैकी एक. डॉ. सदानंद मोरे यांच्या संशोधनात्मक पुस्तकांचा उल्लेख करणं अगत्याचं आहे. त्यातही 'तुकाराम दर्शन' हे त्यांचं पुस्तक मराठी साहित्यातील किती मोठी देण आहे ते वाचूनच कळू शकेल. कथा-कादंबऱ्या वाचणं तसं फार आधीपासून आणि खूप आवडीचं नाही; पण त्यांची ताकद समजते तेव्हाच आपण त्यांच्याकडे वळतो, नव्हे वळवले जातो! आशा बगे यांच्या कथा केवळ जीवापाड आवडतच नाहीत, तर त्या कथालेखनाचा मापदंड वाटतात. खालोखाल अरुणा ढेरे आणि नीलिमा बोरवणकर यांचं नाव घ्यावं लागेल. आशा बगेंचा 'मारवा' आणि अरुणा ढेरेंचा कृष्णकिनारा यांना तोड नाही. प्रकाश संतांचा लंपन विसरून तरी कसा चालेल? शब्दांतून सर्व वयोगटांच्या मनात घर करणारी संतांची शैली रमणीय आहे. मंगला गोडबोले यांच्या विनोदी कथा चवीपुरत्याच वाचलेल्या असल्या तरी चवीने वाचल्या आहेत. स्त्रीवाद



आणि बंड, सामाजिक विद्रोह आणि संघर्ष पुन्हा पुन्हा एकाच प्रकारे मांडणाऱ्या अनेक कथांपेक्षा घरगुती गंध पण सामाजिक अवकाश असणाऱ्या नि त्यातून आतल्या डोहात प्रकाश टाकणाऱ्या वरील लेखकांच्या कथा वेगळ्या आणि महत्त्वाच्या वाटतात. बाळ फोंडके आणि श्रीनिवास शारंगपाणी यांच्या विज्ञान कथा तितक्याच ताकदीच्या आहेत. डॉ. श्रुती पानसे यांची सगळीच पुस्तकं सोप्या शब्दांत उलगडत जाणारी आहेत. आनंद नाडकर्णी यांची 'मनोगती' सारखी काही पुस्तकही अशीच महत्त्वाची. कादंबरी म्हटलं तर फक्त गो.नि. दांडेकरांच्या नितांत सुंदर अशा मृण्मयीचा उल्लेख करायला आवडेल. चरित्र/आत्मचरित्र म्हटलं तर कार्व्हरपासून ताई मी कलेक्टर व्हयनूपर्यंत बरीच पुस्तकं सांगता येतील. स्वामी विवेकानंदांनी लिहिलेली, त्यांच्यावर लिहिली गेलेली आणि त्यांच्या भाषणांची अशी अनेकानेक पुस्तकं आजवर वाचली गेली आहेत. तो बुद्धी तल्लख करणारा नी अक्षरशः जागा करणारा असा खळाळता झराच! संत साहित्य वाचणं हा तर सुखाचा विषय आहे! मनातील मोगऱ्याला गंधाळणारं हे वाङ्मय भक्तीचा आल्हाद देणारं आहेच, पण संत साहित्याचं महाद्वारदेखील आहे. त्याच्या गाभाऱ्यापर्यंत नव्याने जात राहण्याचे प्रयत्न सुद्धा समृद्ध करत राहतात.



हे वाचन मुख्यतः प्रत्यक्ष छापील पुस्तकांतून होत असलं, तरी आभासी माध्यमाला ते पारखं नाही. ई–बुक क्वचित चाळल्या जात असल्या, तरी फेसबुकवर मात्र ई–वाचन होत राहतंच. काही लेखकांच्या आभासी भिंतींवरील पोस्ट्सदेखील वाङ्मयीन गुणवत्तेने परिपूर्ण असतात. या लेखात अनेक लेखकांची, पुस्तकांची नावं राहून गेली आहेत. पण लेखनमर्यादेचा विचार करून पुस्तकांऐवजी लेखकांच्या नावांना प्राधान्य दिलं आहे, त्यावरून आणखीन पुस्तकांचा साधारण अंदाज यावा. वाचकाचा म्हणून आपला जो पिंड असतो त्यावरच तर आवडते लेखक आणि पुस्तकं ठरत जातात. अर्थात, हा पिंड तुमच्या स्वभाव आणि संवेदनशीलतेवर, दृष्टिकोन आणि चिंतनशैलीवर अवलंबून असतो, असं वाटतं. कोणतंही पुस्तक वाचत असताना, लिहिणाऱ्याच्या तळव्यावरची रखरख आपल्या मनावर किती उमटतेय, त्याच्या मनातील चिंतनाची नक्षी आपल्या आत किती झिरपतेय आणि या सगळ्याकडे एक वाचक म्हणून स्वतःच्या दृष्टीने पाहताना आपल्याला प्रकाशाचं एक तरी बी मिळतंय का आणि ते आत किती रुजतंय अशा अनेक बाबी महत्त्वाच्या वाटतात. त्यात, वाचन ही काही एकदाच घडणारी गोष्ट नाही. तेव्हा, वाचता वाचता.. आपलाच अंतःस्वर शोधत जाताना वाट किती उरली आहे हा प्रश्नच उरत नाही. कारण, वाटच आनंद होऊन गेली असते, आणि प्रवास हेच गंतव्य झालेलं असतं.

# वाचाल तर वाचाल



मृण्मयी चितळे

‘‘मृण्मयी, उन्हाळल्याची सुट्टी सुरू होऊन एक आठवडा झाला. आता उद्यापासून रोज किमान अर्धा तास पुस्तक वाचायचं.’’

हे माझ्या आईचे ठरलेले वाक्य. आठवडाभर मज्जा करून झाली की, आता दिवसातला किमान अर्धा तास हा वाचनासाठी द्यायचा. एवढंच नाही, तर पुस्तक वाचताना कोणता नवीन शब्द आढळला तर तो एका वहीत लिहून काढायचा आणि त्याचसोबत त्याचा अर्थ लिहून काढायचा. हा ठरलेला उपक्रम.‘‘वाचाल तर वाचाल!’’ हे वाक्य

ऐकवून आई आम्हांला वाचनासाठी एका जागेवर बसवायची. आईकडून आजही हे वाक्य मी ऐकते. तर, थोडक्यात सांगायचं म्हणजे वाचनाची सवय मला लागली, ती माझ्या आईमुळे. या सवयीचे रूपांतर गोडीमध्ये झाले ते माझ्या आजोबांमुळे आणि बाबांमुळे. लहानपणी गणिताचा अभ्यास करायला मी माझ्या आजोबांसोबत बसायचे. मला शिकवलं. आणि १० गणितं सोडवायला दिली, की ते त्यांचं पुस्तक वाचत माझ्या शेजारी बसायचे. कुठे प्रवासाला गेलो, तरी गाडीत ते नेहमी पुस्तक वाचायचे. कधी पु.लं.चं 'बटाट्याची चाळ' तर कधी 'जेफरी आर्चर' तर कधी 'युगंधर'.




"काय बरं एवढं आहे त्या पुस्तकात..?" असा विचार माझ्या मनात यायचा. कुतूहल म्हणून मीदेखील घरात असलेल्या पुस्तकांपैकी एक पुस्तक घेऊन ते वाचायला लागले. अशाप्रकारे मला वाचनाची आवड लागायला लागली. शाळेमध्ये होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धा, काव्यपाठांतर स्पर्धा, याच्यात मी आवर्जून भाग घ्यायचे. त्या निमित्ताने इंग्लिश, हिन्दी आणि मराठी या तिन्ही भाषांमधले कधी काव्यसंग्रह तर कधी आत्मचरित्र यांच्याशी संबंध यायचा. असं करता करता, मला कळलच नाही की कधीपासून "तुझे छंद कोणते?" असं विचारल्यावर मी इतर

छंदांबरोबर, वाचनाचा उल्लेख करायला लागले.

हळूहळू पुस्तकांबद्दल मी बाबांसोबत चर्चा करायला लागले. आवडत्या लेखकाचे नवीन पुस्तक प्रकाशित झाले की, माझे बाबा लगेच ते मागवायचे. कधी कोणत्या सामाजिक अथवा आर्थिक परिस्थितीवर चर्चा करताना माझे बाबा एक वेगळा आणि अनोखा दृष्टिकोन मांडतात. त्याचं कारण म्हणजे त्यांचं असलेल अफाट वाचन.

सामाजिक, आर्थिक, राजनैतिक विषयांशी संबंधित असलेली पुस्तके मी वाचायला लागले, ते माझ्या बाबांमुळे. विधी महाविद्यालयात प्रवेश घेतल्यावर याचा मला नक्कीच भरपूर फायदा झाला. अवांतर वाचनाची सवय असल्यामुळे वर्गात होणाऱ्या चर्चांमध्ये, वादविवाद स्पर्धांमध्ये मी एक वेगळा दृष्टिकोन मांडू शकत होते. कोणतेही पुस्तक हे केवळ एक पुस्तक नसून एक विचार आहे याची जाणीव मला झाली.

पुढे जाऊन जाणवले, की नुसताच विचार नाही तर एक परिपूर्ण अनुभव आहे. याची जाणीव मला करून दिली ती माझ्या कला शिक्षणाने. भरतनाट्यम् शिकताना, अभिनयाचा अभ्यास करताना, एखाद्या पात्राला काय वाटते, तिचा अनुभव काय आहे, तिची परिस्थिती काय आहे याचा परिपूर्ण आणि परिपक्व विचार करणं फार महत्त्वाचे! हा विचार जेवढा जाणीवपूर्वक, तेवढाच अभिनय चांगला. जे अनुभव पात्राला आले आहेत, ते बहुदा आपल्याला आपल्या आयुष्यात आलेले नसतात. मग अशा वेळी त्या पात्राचा

अनुभव समजून घ्यायचा असेल, तर त्या संबंधित पुस्तक वाचन, कादंबरी वाचन, कविता वाचन हे फार महत्त्वाचे ठरते. आपण प्रत्यक्षपणे आपल्या आयुष्यात जरी तो अनुभव घेतला नसला, तरी त्या संबंधित असलेले पुस्तक मनापासून जर आपण वाचलं, तर त्या अनुभवाच्या जवळपास का होईना आपण जाऊ शकतो. एवढी ताकद ही शब्दांमध्ये निश्चितच आहे!

त्याचबरोबर, पुस्तक वाचताना आपली कल्पनाशक्ती जागृत होते. लेखकाने लिहिलेली वर्णने वाचून आपल्या डोळ्यांसमोर चित्र उभी राहायला लगतात. गमतीचा भाग असा की, हे चित्र प्रत्येकाचं वेगवेगळं असू शकते. त्यामुळे, पुस्तक हा एक अनुभव आहे आणि हा अनुभव प्रत्येक वाचकाच्या वयानुसार, आयुष्यानुसार, परिस्थितीनुसार वेगवेगळा ठरतो. बऱ्याच वेळा असे होते, की आपण एक पुस्तक वाचतो, आपल्याला ते आवडते. पण काही वर्षांनी ते वाचलं, की आधी आलेल्या अनुभवापेक्षा संपूर्णपणे वेगळा अनुभव आपल्याला येतो... अशा काही ओळी ज्या आपण दुर्लक्षित केल्या होत्या, त्या प्रकर्षाने आपल्याशी संवाद साधू लागतात. हीच तर मज्जा आहे वाचनाची! ही मज्जा प्रत्येकाने अनुभवावी अशी! तर मग, हे वाचून झाल्यावर तुम्ही कोणतं पुस्तक वाचणार आहात? कोणता ''अनुभव'' तुम्हाला खुणावत आहे?

# वेबसिरीज आणि मी



|| दिवाळी अंक २०२४ ||

युवाविवेक

# I'mmature



## शिवम थोपटे

इमॅच्युअर ही एक हलकीफुलकी आणि मनोरंजक वेबसिरीज आहे, जी विशेषतः तरुण पिढीच्या जीवनातील विविध पैलूंचा अभ्यास करते. ही कथा मुख्यतः कॉलेजच्या जीवनावर आधारित आहे आणि यामध्ये प्रेम, मैत्री, स्वप्नं आणि आव्हानं यांचा समावेश आहे.

कथेच्या केंद्रस्थानी चार मित्र आहेत, ज्यांच्यातील नातेसंबंध, संघर्ष आणि त्यांच्या आयुष्यातील प्रगती या गोष्टींचा समावेश आहे. प्रत्येक पात्राची व्यक्तिमत्व वैशिष्ट्यपूर्ण आहे आणि त्यांचे अनुभव विविध स्तरांवर




आहेत. या मित्रांचे नातेसंबंध, प्रेमात अडकणे आणि त्यांच्या स्वप्नांच्या मागे धावणे यामध्ये सुसंगतता आहे.

मालिकेतील संवाद हलके आणि मजेशीर आहेत, जे प्रेक्षकांच्या मनात हास्य आणतात. पात्रांच्या चरित्रांमध्ये एक प्रकारचा जिवंतपणा आहे, ज्यामुळे प्रेक्षक त्यांच्याशी सहजपणे स्वत:ला जोडून घेऊ शकतात. उदाहरणार्थ, प्रेमात पडणे, धोके पत्करणे आणि एकमेकांच्या समर्थनाची



आवश्यकता यासारख्या अनुभवांमध्ये खूप काळजीपूर्वकता आहे. काही ठिकाणी कथेतील परिस्थिती थोडी अनियंत्रित होते आणि पात्रांच्या निर्णयांमध्ये थोडी अस्वस्थता दिसते. या सिरीजचा आणखी एक सकारात्मक पैलू म्हणजे संगीत. प्रत्येक दृश्याला अनुकूल असलेल्या गाण्यांनी आणि पार्श्वसंगीताने प्रेक्षकांना एक वेगळाच अनुभव दिला आहे. त्यामुळे, ही मालिका केवळ मनोरंजनाचे साधन नाही, तर ती तरुणांच्या जीवनातील विविध आयामांना स्पर्श करते.

इमॅच्युअर एक आकर्षक आणि हलकीफुलकी कथा आहे जी तरुण पिढीच्या मनाशी थेट जोडली जाते. तिच्या मनोरंजक कथानकामुळे आणि पात्रांच्या जिवंतपणामुळे, ती खूपच लोकप्रिय झाली आहे. एकंदरीत, हा एक उत्कृष्ट पर्याय आहे जो तुमच्या आनंदाची गॅरंटी देतो.

# Made In Heaven



माही गाडगीळ

आजूबाजूला असलेले झगमगणारे दिवे, तो मंद अत्तराचा येणारा सुगंध अणि डोक्यावर अलगद टोचणाऱ्या अक्षता. नजर पोहोचते तिथवर दिसणारे रंग आणि इथे ऐकू येणारे हास्य, तर तिथे मनात दाबलेले रडू. या वातावरणाचा अनभुव आपण सगळ्यांनीच घेतला असेल. नाही का? लग्न ही परंपरा, भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग मानली गेली आहे. ही सस्ंथा गेल्या अनेक वर्षांपासून मानवाच्या जीवनाचा भाग म्हणून आपल्यात वावरते आहे. काळ, अनभुव आणि माणसे यांच्यावर अवलंबून असलेली ही लग्न



संस्था, कायम एकाच प्रवाहात वाहत राहिलेली नाही. कारण मुळात बघायला गेले तर ती अशा काही घटकांवर आधारित आहे जे सतत बदलत असतात. तसेच, आजच्या या आधुनिक काळात ह्या लग्नसस्थेनी घेतलेले रूप हुबेहूब मांडले आहे 'मेड इन हेवन' या वेबसिरीजमध्ये.

'मेड इन हेवन' ही वेबसिरीज २०२१ साली ऍमेझॉन प्राइम या माध्यमावर प्रेक्षकांसाठी उपलब्ध झाली. झोया अख्तर यांनी या वेबसिरीजचे दिग्दर्शन केले आहे. हिंदी सिनेमा क्षेत्रातील नावाजलेल्या दिग्दर्शकांपैकी झोया अख्तरदेखील एक दिग्दर्शक आहेत असे दिसनू येते. एक्सेल इंटरटेन्मेन्ट हे या वेबसिरीजचे निर्माते आहेत.

तारा खन्ना आणि करण मेहरा या दोघांची गोष्ट दोन सीजन्समध्ये या वेबसिरीज मध्ये मांडलेली आहे. गोष्टीचा सुरुवातीलाच आपल्याला कळते की तारा व करण हे 'मेड इन हेवन', या नावाच्या कंपनीचे मालक आहेत, जी दिल्लीमध्ये आहे. 'मेड इन हेवन' ही कंपनी एखाद्या लग्नाचा समारंभ आयोजित करण्यासाठी काम करत असते. लग्न करू पाहणाऱ्या जोडप्यांच्या आवडीनिवडी लक्षात घेणे, त्यांना



अपेक्षित आहे तशी सजावट ही करून देणे व त्याचबरोबर त्या लग्नासाठी लागणारी प्रत्येक गोष्टीकडे बारकाईने लक्ष देणे हे या दोघांचेही काम असते. आता ही गोष्ट अशी उघडपणे बघता, 'मेड इन हेवन' या कंपनीचे काम अतिशय सोपे आहे, असे वाटायला लागते. व्यवस्थापन हे कितीसे अवघड असेल ना? परंतु सोन्याने नटवलेल्या कुठल्याही सत्याला एक कुरूप बाजूसुद्धा असते. पैसा, संपत्ती, मान, हुद्दा, जात, धर्म, लिंग या साऱ्यावर लग्न हा विधी येऊन थांबतो. या वेबसिरीज ची खरी गोष्ट तर ह्या विचाराच्या प्राप्तीनंतर समजायला लागते.

दोन व्यक्तींमधल्या प्रेमाला पूर्तता देण्याचे काम विवाह संस्था करत असते, असे आपल्याला कायमच सांगितले गेले आहे. आता या सांगितल्या गेलेल्या वाक्याची सत्यता तपासण्याआधी, ही वेबसिरीज आपल्याला असा प्रश्न विचारते की, मुळात प्रत्येक माणसासाठी जिवंत राहायला प्रेम महत्त्वाचे आहे का? जिवंत राहायला जरी प्रेम महत्त्वाचे असले तरी प्रत्येकाला आयुष्यात ते मिळतेच असे नाही.

खूप सोप्या आणि साध्या भाषेत 'मेड इन हेवन' आपल्याला हे सांगून जाते. या वेबसिरीज चा प्रत्येक एपिसोड एक नवीन लग्नाची गोष्ट मांडण्याचा प्रयत्न करताना दिसतो. त्याचबरोबर तारा आणि करण यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दलसुद्धा एक बाजू समजत असते. एक धावती गोष्ट आपल्याला माणसाने या स्वतःच्या हातानी तयार केलेल्या समाजाचे काय करून ठेवले आहे हे दाखवते. स्वत:ला आधुनिक म्हणणारे आपण अजूनही अनेक पूर्वापार चालत आलेल्या बेड्या घेऊन फिरतोय हे आपले आपल्यालाच कळते. धन आणि संपत्ती हे जरी तुम्हाला आनंद आणि समाधान देऊ शकले नाही तरी, हे सत्य ही सिरीज आपल्यासमोर उघडपणे मांडते की, पैसा हा तुम्हाला एक दर्जा नक्की प्राप्त करून देऊ शकतो आणि मग हा प्रश्न



पडतो की ही शर्यत जी आपण रोजच्या आयुष्यात धावत असतो ती हा अलिखित दर्जा प्राप्त करण्याचीच आहे ना? आपण सगळेच एका अत्यंत स्वार्थी जगात जन्माला आलो आहोत जिथे पैसा बोलतो. जिथे नात्यांच मोल हा मोजलं जात. आणि लग्न या संस्थेचे मूळ जे प्रेम असायला हवे ते आता आपल्याला दिसते की फक्त एक तडजोड झाले आहे.

लग्नासारख्या इतक्या नाजूक विषयाला ‘मेड इन हेवन’ ही सिरीज अतिशय हळुवार प्रकारे हाताळते. ही गोष्ट खूप झगमगणारी आहे, रंगीबेरंगी आहे पण ती तेवढीच खरी आहे आणि म्हणून सुंदर आहे असे मला वाटते. जेव्हा सत्य हे लुकलुकणारे असते तेव्हा त्याच्याकडे सारेच नजर वळवून बघतात आणि म्हणूनच आपल्याला अशा वेबसिरीजची करण्याची, बघण्याची आणि समजून घेण्याची खूप गरज आहे.

# Mirzapur



सिद्धार्थ काणे

Mirzapur is a gripping Indian crime thriller series that captures the chaotic and violent world of a lawless town in Uttar Pradesh. Centered around the power struggles of rival gangs, the show offers a raw and unfiltered look at crime, politics and revenge. The narrative revolves around the infamous Kaleen Bhaiya, played brilliantly by Pankaj Tripathi, who rules Mirzapur with an iron first and the ambitious Guddu and




Bablu Pandit, portrayed by Ali Fazal and Vikrant Massey, respectively The writing is sharp, combining elements of dark humor and intense drama, making it both engaging and thought-provoking. Each episode is packed with twists that keep viewers on the edge of their seats, exploring themes of loyalty, ambition and moral ambiguity. The series doesn't shy away from depicting brutal violence, which may be unsettling for some, but it serves to highlight the grim realities of the characters' lives. Visually, "Mirzapur" stands out with it's gritty aesthetic and immersive setting, capturing the essence of a town steeped in crime. The performances are top-notch, particularly



Tripathi, whose portrayal of Kaleen Bhaiya has become iconic. The chemistry between characters adds depth to the storyline, making the power dynamics all the more compelling.

While the series occasionally leans into familiar tropes of the gangster genre, it manages to carve it's own niche through strong character development and a fast-paced plot. “Mirzapur” is not just a tale of crime; it’s a commentary on the human condition, power struggles and the consequences of ambition. Overall, it’s a must-watch for fans of gritty dramas, delivering a thrilling experience that resonates long after the credits roll.

# Taaza Khabar



**अश्विनी गुंड**

“Taaza Khabar,” released on Disney+ Hotstar, is a Hindi-language comedy-drama web series starring Bhuvan Bam in the lead role, marking his debut in a major web series. Directed by Himank Gaur, the show blends comedy, drama, and fantasy, making it an engaging watch for fans of quirky storytelling.




Plot Summary: The series revolves around Vasya, a sanitation worker who stumbles upon a magical boon that changes his life in unexpected ways. This supernatural twist gives him the power to see future news, which he tries to leverage for his personal gain, leading to a series of humorous and chaotic events. As Vasya navigates the consequences of his newfound power, the series explores themes of ambition, morality, and the unpredictability of fate.

**Performance:** Bhuvan Bam delivers a standout performance, showcasing his range beyond the comedic skits he's known for on YouTube. The supporting cast, including Shriya Pilgaonkar, Deven Bhojani and others, add depth to the narrative with solid performances.

**Pros Unique Concepet:** The show's blend of comedy and fantasy, along with the idea of predicting the future, adds a refreshing twist.

Engaging Performances: Bhuvan Bam's portrayal of Vasya is both humorous and emotional, demonstrating his versatility.

**Good Pacing:** The series maintains a quick






pace, keeping viewers invested in Vasya's journey and the unfolding drama.

Cons Predictable Moments: While the premise is intriguing, some plot points feel predictable and follow a familiar trajectory.

Mixed Execution: The shift between comedy and serious moments can sometimes feel abrupt, slightly affecting the tone.

Verdict: "Taaza Khabar" is an entertaining watch, especially for those who enjoy light-hearted dramas with a sprinkle of fantasy. Bhuvan Bam's performance and the series'

unique concept make it worth a watch, though the execution could have been a bit tighter in certain parts. Overall, it's a fun and engaging show that highlights the unpredictability of life when fate takes a magical turn.

# Stranger Things



यश पाटील

Name of the series : Stranger Things
Writer : Duffer Brothers
Director : Matt Duffer & Ross Duffer
Genre : Sci-fi, Horror, Drama
Rating : 8.7/10

Cast: Millie Bobby Brown, Finn Wolfhard, Noah Schnapp, Wiona Ryder, David Harbour, Gaten Matarazzo, caleb Mclaughlin, Satie Sink, Natalia Dyer,




Charlie Heaton, Joe Keery

Stranger Things is a popular netflix series, it blends action horror, drama and sci-fi with 1980's pop culture refrences.

The plot of the series involves the fictional town, Hawkins, Indiana, where residents are terrorized by a hostile alternate dimension, called as 'upside Down' after a government secretly opens a lab and a gateway between the two worlds.

so, far 4 seasons have been released. The episodes in each season have a unique angel. As the series continues, the people in Hawkins face various dangers from creatures in upside down. Each season delves deeper into th mysteries surroundings the town, the characters personal struggles, the changes in theirs lives, the battle to protect the Hawkins from



the creatures of upside down

The first seasons begins in Nov.1983 will Byers is adbucted by a creature from Upside Down His mother, Joyce; the police chief, Hopper and his friends search for him. Meanwhile, they meet Eleven who is psychokinetic girl & find will the first season introduces characters & the main theme. The second season describes & shows the dynamics of the Hawkins & new characters will who was rescued, is still being possessed by an entity from the Upside Down World. This Season delves deeper in the world building.

The third season is full of 1980's refrences, nostalgia and action. The new mall becomes the talk of the town & grabs the attention of every single person in Hawkins. Will & his friends along with Eleven and Max visit the mall. The friendship & relationships are now



strong between the characters
The Mind Flayer terrorizer entire Hawkins
In Fourth Season, we get to see a lot of things happen simultaneously at different Places. The new Vecna comes into existence, the new villain. H causes destruction in Hawkins it leads to havoc. Eleven tries to regain her powers. Vecna possess many characters & threatens them. Also terrizing to a great extent. This was the most action packed now, the fith season is in the filming process. The makers say it will be bigger than ever. Stranger Things is an action packed horror drama series, which has been inspired by many 80's movies. The direction is incredible however, the length of episodes increases as the series progresses At the end of the series we get 2 final lengthiest episodes but it's worth it. The cast has done a



praiseworthy act. They have played their characters with excellence & dedication. The Overall aesthetic of the series looks good, also it is then juxtaposed by horrible & scary & dark cinematography during action scenes. Many characters come and go, but some characters leave their imprint & create a unique space in our minds and for me those characters are Eleven, Steve, Nancy & Max so, is this series binge-worthy? The answer is yes, definitely. This series is a complete blend of horror, action & drama.

# Never Have I Ever



अनुजा ब्रह्मे

Humans experience a range of different emotions, pleasant and unpleasant. These emotions have a tremendous capacity to influence our thoughts and ultimately, behaviour. When acknowledged and accepted, these emotions let us live a psychologically rich life. However, when left unprocessed, rushed or blocked, they leave us with poor functioning, painful experiences and bizarre consequences.




Never Have I Ever, a story of a 15 year old sophomore, Devi Vishwakumar, is a similar story.

With a brilliant academic record and talent, Devi is a popular girl in Sherman Oaks High School. She has Elinor and Fabiola, two of her besties she can share secrets with. Devi is raised by her mom, a practicing dermatologist and a woman of discipline strictly adhering to Indian traditions and values, and Devi's favourite, her hero, her father. Devi experiences trauma with her father's sudden demise by heart attack in her concert in her school. The girl is shattered with shock and pain. She visits her therapist Dr. Ryan regularly to have professional psychological support.

While Devi denies the need to let the grief be processed, her romantic life starts to get

affected. The web-series depicts it well how Devi constantly chases love & popularity to feel okay. She struggles to maintain cordial relationships, forces herself to prove better and to crave for things. She might not really



want or is not even ready for the confusion reflects in her decisions.

People start to call her "Crazy Devi". She becomes unable to see her mother's struggle of raising her alone. Whenever she is disturbed, she sees and hears her demised father. She struggles to process and accept that he is no more. She takes everyone and everything competitively, faces hard times prioritizing her dates and best friends and fails to see true love and care from her



“nemesis” Ben. She often lies, and hurts people unknowingly. She unintentionally causes a rumour about her romantic rivalry of having an eating disorder and gets suspension.

In contrast with Devi’s side that pursues power, the web series successfully shows an increasing insight among her about her difficulties in adjustment and that it is turning her into someone

she is not. She realizes that she is running behind insignificant pursuits and that she has always chosen to be kind and honest otherwise. Strong and supportive relationships in the series act as a strength for it's characters to lead a meaningful life. Parental support and openness makes it easier for fabiola to come out. Elinor

forgives her mother for abandoning her

and becomes a true example of empathy and compassion. Kamala, Devi's cousin stands for herself and Pati, her grandmother, decides to re-marry.

As Elizabeth Kubler-Ross rightly mentions in her Grief Cycle (1969), processing grief may follow few stages which may differ in the sequence and duration for everyone, of shock/denial, anger, bargaining, depression, learning new roles and finally, acceptance of the loss. The more Devi gives time to allow oneself to just let it process, the closer she gets with her true values and dreams.



In contrast with her initial denial towards mother's new partner, she supports her for the new relationship, stops looking for instant gratification, and becomes more focused on college. She unfolds beautifully

the emotional ties her dream college has with her demised father while writing college SOP. The series ends, thus, with Devi getting a yes from her dream college. I believe, what may look like just a usual teenage drama, actually brings us the idea to be more human to oneself, be brave enough to stand for oneself, value relationships and learn from them.

# बालगीतगायन स्पर्धा

## स्पर्धेविषयी

- संहिता असणे आवश्यक आहे.
- प्रेक्षक लहान मुले असणार आहेत, याचे भान असणे आवश्यक आहे.
- गटात चार स्पर्धक असावेत.
- वयोमर्यादा १८ ते ४५ वर्ष
- सादरीकरण २०-२५ मिनिटांचे असावे.
- सादरीकरणासाठी लागणारी तबला, पेटी, आदी वाद्ये घेऊन यावीत. त्यासाठी वेगळे वादक चालू शकतात.
- बालगीतांची निवड, सहिंता लेखन, सादरीकरण, साथसंगत, एकूण प्रभाव यावर परीक्षण केले जाईल.
- परीक्षकांचा निकाल अंतिम असेल.

| नोंदणीची अंतिम दिनांक | स्पर्धा कधी होणार? |
|---|---|
| १५ नोव्हेंबर २०२४ | रविवार, १ डिसेंबर २०२४ |

**स्थळ**

स्वा. सावरकर अध्यासन केंद्र, डेक्कन कॉर्नर, पुणे

अधिक माहितीसाठी 9049055687, 7378832467

|| दिवाळी अंक २०२४ ||

युवाविवेक

नोंदणीसाठी दिलेला
क्युआर कोड
स्कॅन करा